महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

क्र.कोविमं/१२वी-परीक्षा/खाजगी/1384
दिनांक : २९/०८/२०१८

प्रति,
सर्व प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्व क.महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय : - फेब्रुवारी - मार्च २०१९ च्या परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन (ONLINE) नावनोंदणी अर्जा बाबत...**

**संदर्भ :- १) यां कार्यालयाचे परिपत्रक क्र.कोविमं./१२ वी परीक्षा /खाजगी /१०१३ दि.२१/०७/२०१८**
**२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.कोविमं./१२ वी परीक्षा /खाजगी /११२७ दि.२७/०७/२०१८**

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की ,या विभागीय मंडळामार्फत मार्च-२०१९ परीक्षेसाठीच्या खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया तथा त्या अनुषंगाने करावयाच्या कामकाजासंदर्भात सूचना व मार्गदर्शन खाजगी विद्यार्थी ऑनलाईन नाव नोंदणी अर्जाबाबत आयोजित सभेच्यावेळी केलेले आहे. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांनी खाजगी विद्यार्थी ऑनलाईन अर्जाची नोंदणी केलेली आहे, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज आपल्या शिफारशीसह निर्धारित केलेल्या वितरण केंद्रावर अथवा मंडळ कार्यालयात खालील प्रमाणे कागदपत्रासह प्रस्ताव दिनांक ३१/०८/२०१८ रोजी जमा करण्यात यावा.

१) ऑनलाईन अर्जाची प्रत. २) दि.३१ मे पूर्वी शाळा सोडलेला मुळ दाखला व छायाप्रत (द्वितिय प्रत असल्यास प्रतिज्ञाप्रत जोडणे आवश्यक आहे.) ३) इ. १० वी मुळ प्रमाणपत्र व छायाप्रत. ४) इ.१० वी मुळ गुणपत्रक व छायाप्रत. ५) आधारकार्ड छायाप्रत. ६) नोंदणी फी रु.६००/- (बँकेत जमा केलेले चलन.) ७) विद्यार्थ्यांची यादी .

वरील प्रमाणे कागदपत्रे जमा करावीत.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी -
वितरण केंद्र प्रमुख,
यांना कळविण्यात येते की, त्यांनी वरील प्रमाणे कागदपत्रे तपासून दि.३१/०८/२०१८ रोजी आपल्याकडे जमा करुन घ्यावेत व सदरची कागदपत्रे दिनांक ०१/०९/२०१८ रोजी मंडळ कार्यालयात समक्ष जमा करावेत.

Acer/msword/letter